शाळेतील विदयार्थ्यांना ने आण करणाऱ्या वाहतूक बसबाबत मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१४/(१७२/१४)/एसएम-६**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
तारीख: १८ मार्च, २०१६

वाचा :-

१) शासन अधिसूचना गृह विभाग क्र.एमव्हीआर- ०८०८/प्र.क्र.१५३/परि.२, दिनांक २२.३.२०११ (महाराष्ट्र मोटर वाहन (स्कूल बस करिता विनियम) नियम,२०११)

२) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.पीआरई-२००८/५०६/१११/ प्राशि.१, दिनांक १४.९.२०११

**शासन परिपत्रक :-**

शालेय विदयार्थ्यांसाठी सुरक्षित, सुनियोजित व कार्यक्षम बससेवा सुरु करण्यासाठी गृह विभागामार्फत परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशीनुसार गृह विभागाने संदर्भाधीन दिनांक २२.३.२०११ च्या अधिसूचनेव्दारे मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र मोटर वाहन (स्कूल बस करिता विनियम) नियम, २०११ विहीत केले आहेत. सदर नियमांमध्ये अंशत: सुधारणा करण्याबाबतची अधिसूचना दिनांक ४.५.२०१२ रोजी निर्गमित करण्यात आली आहे.

या नियमाच्या अनुषंगाने राज्यामध्ये शाळेतील विदयार्थ्यांना ने-आण करणा-या बसमधून सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना दिनांक १४.९.२०११ च्या शासन निर्णयान्वये शालेय शिक्षण विभागामार्फत सर्व शाळांना, देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त नियमानुसार प्रत्येक शाळेने परिवहन समिती गठीत करणे आवश्यक आहे. या समितीव्दारा मुलांची सुरक्षितता आणि शाळेतून विदयार्थ्यांच्या ने-आण करण्याच्या मुद्याबाबत आढावा घेण्यासाठी, निर्णय घेण्यासाठी व संनियंत्रण करण्यासाठी तीन महिन्यातून किमान एकदा आणि प्रत्येक सत्र सुरु होण्यापूर्वी बैठकीचे आयोजन करणे आवश्यक आहे. तथापि काही शाळांतून परिवहन समितीच्या बैठका नियमितपणे घेतले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, ही गंभीर बाब आहे.

शालेय विदयार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसंदर्भात धोरण राबविण्याच्या अनुषंगाने जनहित याचिका क्र. २/२०१२ मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी स्वत:हून दाखल करुन घेतली आहे. प्रस्तुत याचिकेच्या सुनावणी दरम्यान परिवहन समित्यांच्या बैठका नियमितपणे घेत नसल्याचे निदर्शनास आल्याने मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी शाळेतील विदयार्थ्यांची सुरक्षितपणे ने-आण करण्या-या स्कूलबस सुरक्षित वाहतूकीसंदर्भात खालील प्रमाणे निर्देश/सूचना दिल्या आहेत.

1) The School Management is required to take care to see that such Buses having appropriate Conductors to look after the children.
2) Once tiny students are travelling in a school bus hired by the school, it is the duty of the School Authorities to see that they reach their home safely.

3) It is the duty of the Conductor of the Bus to remain present when a boys getting down from the Bus and he travels up to the house as in the instant case, tiny children studying in K.G. to Std IV were travelling in the Bus.
4) In every School Bus where by small children are being carried up to the school and thereafter, from school to home, the School Authorities are required to see that an appropriate person should be in the School bus, who would take care of children and would accompany the child when he alights from the bus upto the place of his residents.
5) Small child cannot be left alone and should not be allowed to get down from the Bus on his own.
6) If any school Management is found to be erring, it is the duty of the State Government to cancel registration/recognition of such School.
7) The School Authorities cannot own their income at the cost of small children by not hiring Bus with appropriate staff.
8) All Schools are supposed have a transport committee, with a representative of local police on it, as one of the member. Education Inspector also needs to be a member of that transport committee.
9) School level meetings of the committee constituted for safety of students may conducted regularly.

२. यास्तव शाळेतील विदयार्थ्यांच्या ने-आण करणाऱ्या वाहतूक बससंदर्भात विदयार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेवून (१) मा.उच्च न्यायालयाचे निर्देश (२) महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बस करिता विनियम) नियम,२०११ (३) शालेय शिक्षण विभागाने दिनांक १४.११.२०११ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना इत्यादीं. मा. न्यायालयाचे आदेश, नियम, मार्गदर्शक सूचना यांचे काटेकोरपणे पालन करुन अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबधित शाळा व्यवस्थापनाची राहील. सदर न्यायालयीन निर्देशांचे/नियमांचे/मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्यास संबंधित शाळांची नोंदणी/ मान्यता काढण्यात येईल. ही बाब शाळा व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/(माध्यमिक)/शिक्षण निरिक्षक,बृहन्मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०३१८१७३९४९६६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nand Kumar

Digitally signed by Nand Kumar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, cn=Nand Kumar
Date: 2016.04.06 17:19:02 +05'30'

( नंद कुमार )
**शासनाचे प्रधान सचिव**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव

४) मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
५) मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
६) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
७) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे स्वीय सहायक
८) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
९) सर्व आयुक्त, महानगरपालिका
१०) सर्व विधानसभा सदस्य
११) सर्व विधानपरिषद सदस्य
१२) कक्ष अधिकारी, ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
१३) महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रसिध्दीच्या विनंतीसह-५ प्रती)
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१६) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१९) अध्यक्ष संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे
२०) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
२१) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे
२२) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
२३) संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
२४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
२५) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक/ प्रौढ), जिल्हा परिषद तथा सदर अधिका-यांमार्फत
२६) संबंधित सर्व शाळांचे मुख्याध्यापक
२७) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका /नगरपरिषद
२८) सर्व प्रशासन अधिकारी, नगरपरिषद/ कटकमंडळे
२९) शिक्षण निरिक्षक (दक्षिण / पश्चिम /उत्तर), बृहन्मुंबई
३०) निवड नस्ती, (एसएम-६).